# बलात्कार... एक समस्या



कै. विलास चापेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# बलात्कार : एक समस्या

लेखक : कै. विलास चाफेकर

प्रकाशन : २४ जुलै २०२२

या पुस्तकाचे लेखक जाणीव संघटना
आणि वंचित विकास संस्थेचे संस्थापक
कै. विलास चाफेकर हे आहेत


**वंचित विकास**

४०५/९,नारायण पेठ, मोदी गणपतीमागे, पुणे - ४११०३०
फोन : ०२०-२४४५४६५८,२४४८३०५०

Whats App : +91 7972086730
E-mail : vanchitvikas85@gmail.com

मुखपृष्ठ : श्री. सुनील हंबीर
अक्षरजुळणी : मिनत ॲडव्हरटाइझिंग प्रा. लि., पुणे



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क वंचित विकास संस्थेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट, किंवा इतर रूपांतर करण्यासाठी संस्थेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

# बलात्कार : एक समस्या

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान वंचित विकास, पुणे या सामाजिक संस्थेचे मनःपूर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण वंचित विकास, पुणे यांना ७९७२०८६७३० या क्रमांकावर अथवा vanchitvikas85@gmail.com या ई-मेलवर कळवाव्यात ही विनंती.

धन्यवाद!

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

सादर नमस्कार,

वंचित विकास संस्था गेली ३६ वर्षे स्त्रियांच्या हक्कासाठी, सन्मानासाठी, अस्मितेसाठी काम करते. या स्त्रियांमध्ये अगदी तळातली शरीरविक्रय करणारी स्त्री, एकल महिला, विधवा, परित्यक्ता, अडचणीत सापडलेल्या स्त्रिया, यांच्याबरोबरच अनेक मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय स्त्रिया असे अनेक घटक येतात.

कै. विलास चाफेकर हे जाणीव संघटना व वंचित विकास संस्थेचे संस्थापक आहेत.

स्त्रियांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर उत्तर शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अनेक स्त्रियांच्या कहाण्यांचे ते विश्वासू श्रोता होते.

स्त्रियांच्या प्रश्नामध्ये बलात्कार व बलात्काराला बळी पडलेली स्त्री हा अतिशय संवेदनशील व मनाला जखमी करणारा, आयुष्य उद्‌ध्वस्त करणारा विषय आहे.

बलात्काराच्या अनेक बातम्या सतत वर्तमानपत्रात, दूरदर्शनवर येत असतात. त्या बातम्यांच्या मागचे चेहरे, त्यांच्या यातना, त्याची कारणं समजून घेण्याचा कै. विलास चाफेकर यांनी प्रयत्न केला. सरांनी त्यांच्या शेवटच्या दिवसात या विषयाची परखड मांडणी केली. त्यांचे विचार स्पष्ट, स्वच्छ व समाज उपयोगी आहेत. कायम निर्भीडपणे ते विचार मांडत असत.

सरांच्या माघारी आम्ही त्यांचे हे लेखन **‘बलात्कार : एक समस्या’** या छोट्या पुस्तिकेतून आपल्यापर्यंत पोचवीत आहोत.

कळावे.

आपले,

**मीना कुर्लेकर**
संचालक
**वंचित विकास.**

**सुनीता जोगळेकर**
संचालक
**वंचित विकास**

# बलात्कार : एक समस्या

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं, आज त्या घटनेला ७० वर्षांहून जास्त काळ लोटला आहे. देशाच्या विभाजनाच्या वेळी बळी दिला गेला, तो बायकांच्या अब्रूचा. हिंदू-मुस्लिम, भारत-पाकिस्तान युद्ध, मुर्दाड बनलेली माणुसकी, यात स्त्रियांचा दोष काय होता? जगात जिथे जिथे युद्ध झाली, ती बहुतांशी लढली गेली पुरुषांकडून. पण बळी दिला गेला तो बायकांच्या चारित्र्याचा. हा इतिहास आहे. रामानंद सागर यांनी लिहिलेली 'और इन्सान मर गया' वाचलं की आजही अंगावर काटा येतो.

मी डॉक्टर नाही, शिक्षक नाही, धर्मप्रसारक नाही, कोणत्याही विषयातला तज्ज्ञ नाही, स्त्री-पुरुष लैंगिक प्रश्नांचा अभ्यासक नाही. तरीही अनेकानेक स्त्री कहाण्यांचा विश्वासू श्रोता आहे. स्त्रीपुरुषांच्या अनेक चर्चा मी ऐकत असतो. कॉलेज तरुणीवर बलात्कार, विवाहितेवर बलात्कार, स्त्रिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून पळून जाणे, गावात पतीने गावकीचा नियम मोडला म्हणून पत्नीची विवस्त्र मिरवणूक काढणे, पार्टीत भांडण संपले असं दाखवून एखाद्याची पत्नी गायब करून तिला हॉटेलच्या मोठ्या शेगडीत टाकून देणे, अशा कितीतरी घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात.

याचा अर्थ स्त्रीला उजळ माथ्याने फिरता येत नाही असं नाही. पण जरा कुठे बिनसलं, झगडा, तंटा झाला की, त्यात होरपळून निघते ती फक्त बाई. बाई इतकी स्वस्त का आहे? या सर्व घटनांतील गुन्हेगार जन्मठेपेच्या शिक्षेला पात्र ठरणारे आहेत. पण बहुसंख्य गुन्हेगार पळून जातात. सापडले, तरी भक्कम रकमा उकळणारा वकील देऊन सुटतात. अधुनमधूनच न्यायालय गुन्हेगाराला रास्त शिक्षा देते. न्याय न्याय म्हणतात तो कोणत्या बाजारात व केवढ्याला मिळतो, हे बाईला कळतच नाही.

चालत्या बसमध्ये एकट्या असलेल्या स्त्रीवर चार पुरुषांनी बलात्कार केला. अत्यंत विकृत व पाशवी अत्याचार केले, त्याचे ढळढळीत पुरावे असूनसुद्धा केस दीर्घकाळ चालली. आरोपींना शिक्षा झाली. पण त्या प्रकरणातील बाई केव्हाच हे जग सोडून गेली होती.

बलात्काराच्या केसमध्ये त्या बाईला न्याय मिळाला असं समजायचं का? की तिच्या नातेवाईकांना न्याय मिळाला असं मानायचं? आरोपींना सर्वात कठोर शिक्षा देऊन समाजाला जरब बसली का? अत्यंत किचकट न्यायालयीन प्रक्रिया पार पाडली जाते व निर्णय दिला जातो. म्हणून न्यायव्यवस्थेवर पापभीरू माणसांचा विश्वास तरी आहे.

बलात्कार व बलात्कार करुन खून केल्याच्या बातम्या सतत

प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध होत असतात. याचा अर्थ बलात्काराचे प्रमाण अलीकडेच वाढलं आहे काय? म्हणजे पूर्वी बलात्कार होत नव्हते की काय? तसं समजण्याचं कारण नाही. भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात असं दिसतं की, पुरुषांच्या उन्मादात स्त्रियांवर बलात्कार झालेच आहेत. पूर्वीही बलात्कार होत होते व आजही होत आहेत. याला जबाबदार कोण? बहुतेक पुरुषांचं म्हणणं असं की, याला बाईच जबाबदार असते. वाईट म्हणजे सर्वसामान्य बायकाही मोठ्या संख्येने बायकांनाच दोषी धरतात. 'ती तसलीच होती' असं म्हणतात. 'तसलीच' म्हणजे काय? छचोर म्हणायचं का? 'मुली अंगप्रदर्शन करतात, फॅशन करतात मग त्यांच्या उघड्या अंगाकडे पुरुष चोरट्या नजरेने पाहणारच ना? त्यांचं मन चाळवतं. मग काय होणार' संधी मिळाली की, हेच होणार. असं अनेक लोकांचे मत असते.

आजकाल सिनेमांचा नको तेवढा प्रभाव तरुण पिढीवर पडत आहे. जे पडद्यावर तेच मग रस्त्यावर. मुलींच्या हावभावात नको तेवढा मोकळेपणा असतो. पालकांना स्वत:लाच शिस्त नाही. मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. सगळं लक्ष पैसा ओरबडण्यावर. आपलं काहीतरी चुकतंय, याची भीती मनात असतेच. मग या चुकांचं परिमार्जन करण्यासाठी मुलं जे जे मागतील ते ते पालक देतात. मग ते हॉटेलिंग

असो, फॅशनेबल कपडे असोत किंवा काहीही. पार्ट्या असतातच, मुलंही इतकी हट्टी झाली आहेत, की विचारायची सोय नाही. पालक पाल्याचा मार्कबुकातील गुणांपासून उधळलेल्या दुर्गुणांची उजळणी करतात. पुरुष पालक धाक दाखवण्यासाठी आरडाओरडा करतात. क्वचित एखादा तडाखाही देतात. मुले मुली फिल्मी स्टाईलने आकांडतांडव करीत जीव द्यायला जातात. काही तर खरोखरीच जीव देतातही. मग पोलीस, कोर्ट, जाबजबाब, हजार लफडी. आई तर घाबरुनच जाते आणि आईनेच नीट संस्कार केले नाहीत, असं म्हणून आजूबाजूचे सगळे पुरुष त्यांना दोषी धरतात. यापेक्षा 'मुलांचे हट्ट पुरवा' अशीच भूमिका बहुतेक आया घेतात. स्त्रीवर अन्याय करण्यात ही सगळी मंडळी अहमहमिकेने सहभागी होत असतात.

***

स्त्री ही मोलकरीण आहे, दासी आहे, तिला अक्कल नाही, ती शिकून काय दिवे लावणार? 'रांधा वाढा उष्टी काढा' हेच तिचं काम. दिवसभर राब राब राबायचं, पुरुषाची लहर लागेल तेव्हा त्याची शेज सजवायची. स्वत:ला उत्साह असो वा नसो, किती मुलं जन्माला घालायची याचा विचार न करता मुलं जन्माला घालण्याचं मशीन व्हायचं. या अवस्थेतून बाहेर पडून बाईनं आता शिकलं पाहिजे स्वत:चं करिअर

केलं पाहिजे, पैसा कमावला पाहिजे. घरातली कामंही स्मार्टपणे केली पाहिजेत. शिवाय आल्यागेल्याचं तोंडभरून स्वागत केलं पाहिजे, आजाऱ्या पाजाऱ्याची शुश्रूषा केली पाहिजे. हे सर्व तिने उत्साहानं, आनंदानं केलं, तरच ती स्मार्ट! असं पुरुषांना वाटतं. आम्ही दरवर्षी ८ मार्च साजरा करतो, तेव्हा घसा खरवडून सांगतो की, स्त्री जगाची प्रेरणा आहे. मूल्य म्हणजे काय ते ती जाणते. पुढील पिढीवर मूल्यांचे संस्कार करते. तीच एक आदर्श आहे. घरच्या पातळीवर येणाऱ्या संकटांशी ती झुंजतेच, पण आता सैन्यात आघाडीवर राहून शत्रूशी मुकाबलाही करते आहे. ती क्षणाची पत्नी (पत्नी हा शब्द उच्चारण्याची व लिहिण्याची सवयही नाही) आणि अनंत काळाची...वगैरे वगैरे आहे. तिचं हे महत्त्वाचं योगदान विसरू नये. सारा देश तिची पूजा बांधत असताना, ती तिचे कर्तव्य करत असते, ते न करण्याचा अधिकार तिला नाही. पुरुषवर्ग कर्तव्यच्युत झाला तरी चालेल. ती तिच्या कर्तव्यापासून ढळू शकत नाही.

एकीकडे स्त्रियांची स्तुती करायची, तिला मखरात बसवायचं, कुटुंबातील सदस्यांच्या स्वास्थ्याची जबाबदारी तिच्याच गळ्यात टाकायची. स्त्री किती आदर्श आहे म्हणून ढोल बडवायचे. पण त्याचवेळी दुसरीकडे पदोपदी तिचे खच्चीकरण कसे होईल, समाजात ती

मोकळेपणे वागू शकणार नाही असं पाहायचं. दुटप्पीपणा तुझे नाव पुरुष. पुरुष स्वत:ला असामान्य कर्तृत्वाचा पुतळाही समजतो. या पुरुषसत्ताक देशात स्त्रियांची संख्या निम्मी असली म्हणून काय झालं? पुरुष स्वत:ला सामर्थ्यशाली व सर्वज्ञानी समजतो. स्वतःला स्त्रियांचा रक्षणकर्ता समजतो. बंदुकीच्या व बॉम्बच्या काळात कितीही लांबून माणसं मारता येत असली म्हणून काय झालं? भारतातला पुरुषच स्त्रीचा रक्षणकर्ता आहे, अगदी सदासर्वकाळ. केवळ भारतातलाच नव्हे, साऱ्या जगातला. पुरुषवर्ग हेच समजतो की, तो स्त्री वर्गाचा रक्षक आहे.

बऱ्याच वर्षापूर्वी घडलेलं मुंबईतल्या धारावी या प्रचंड मोठ्या झोपडपट्टीतलं हे उदाहरण आहे. ('द बिगेस्ट स्लम इन एशिया,' असं वर्णन धारावीचं करतात) तर या धारावीचा विकास साधायचा म्हणून एक ओपनएअर थिएटर बांधण्यात आलं. या थिएटरमध्ये सर्वांना आपल्या वाहनात बसून सिनेमा पाहण्याची सोय होती. एका रात्री सिनेमाचा शो संपला. चार चाकी वाहन भुर्रकन निघून गेली. एक स्कुटरवाला आपल्या पत्नीसह थांबला होता. कारण, स्कुटर सुरूहोत नव्हती. वेळ रात्री १ ची. बहुतेक प्रेक्षक निघून गेलेले. कोणी जवळपास दिसत नव्हतं. असले तरी त्यातल्या प्रत्येकाला आपण एकटे आहोत याची जाणीव झालेली. त्यामुळे तेही थोडेफार भांबावलेलेच. इतक्यात स्कूटरवाल्यापाशी

दोघेजण आले. त्यांच्या हातात रामपुरी चाकू होता. ‘साब, काय को खालीपिली किक मारता है? चलते चलते तुम अपने घर जाव. तुम्हारी ये बीबी आज की रात हमकू चाइये। सुबु होते ही हम उसे घर भेज देंगे.’ तो पराक्रमी स्त्रीरक्षक पुरुष, त्या दोघांवर आवेशात चालून गेला. दोघे पटकन् हसले. त्याची अर्धांगिनी त्याला म्हणाली ‘आता मी तर वाचणार नाही. घरी दोन लहान मुलं आहेत. त्यांना तरी वाचवा. मी जगले तर येते घरी. माझी काळजी करू नका.(दुसरी बायको मिळेलच) घरी जा. किमान मुलांना तरी वाचवा’ ती व्यवहारी होती. दात ओठ खात हा रक्षणकर्ता पाय ओढत घरी निघाला. (मेलो तरी बेहतर. पण बायकोला वाचवीन असं हा बाणेदार पुरुष का नाही म्हणाला, त्याचा पुरुषी बाणा कुठे गेला होता?)

सकाळी म्हणजे पहाटेच ती स्वत:च्या घरी आली. थेट बाथरुममध्ये आंघोळीला म्हणून गेली. स्वत:च्या अंगावरचे ओंगळ स्पर्श धुण्यासाठी. पण गीझरची वायरच तिने ओढली एक अस्पष्टशी किंकाळी आली. नवरा धावला. दरवाजा तोडून बघतो तो काय! शॉक बसून बायको मेलेली. रक्षणकर्ता या भूमिकेतला पुरुष गलितगात्र झाला होता.

स्त्री ही रक्षणीय आहे! स्त्रीचं रक्षण करण्यात पुरुषाचा अहंकार सुखावतो. वास्तविक स्त्री व पुरुष दोघेही तुल्यबळ प्राणी आहेत. एक नर,

एक मादी. दोघांच्या भूमिका वेगळ्या. अश्मयुगात स्त्री व पुरुषांच्या भूमिका समानच असाव्यात. स्नायूंची बळकटी सारखीच असावी. कारण, पुरुषाच्याच वेगाने स्त्री शिकारीसाठी धावत असे. युगं लोटली, काळ बदलला. स्त्रीची भूमिका बदलली. स्वत: ती बदलली नाही तर कपटाने पुरुषाने ती भूमिका तिच्यावर लादली.

***

केव्हातरी माणसाला शेतीचा शोध लागला. त्याच्या लक्षात आलं की, जमिनीच्या पोटातून धान्य उगवतं, तसं बाईच्या पोटातून मूल जन्म घेतं. धान्य राखायचं तर भुई जपली पाहिजे. तसं मूल हवं असेल तर बाईला जपलं पाहिजे. दगडाच्या शस्त्रांनी लढणाऱ्या बायकांच्याही हे लक्षात आलं की, आपल्यात आणि नरात फरक आहे. आपल्याला मूल होतं नराला नाही.

मूल होण्याच्या काळात आणि मूल झाल्यावर काही काळ आपण नरांबरोबर, शिकारीला जाऊ नाही शकत. ही आपली कमजोरी आहे! स्त्रीला सृजनाची शक्ती मिळाली आहे. ती पुरुषाला नाही. पण ते लक्षात न घेता ती स्वत:ला काही काळ दुबळी मानते. इथेच तिने स्वत:च्या पराभवाचा दगड पक्का केला. या संधीचा फायदा स्वार्थी नरांनी घेतला. कोणीही माणूस प्रथम स्वार्थीच असतो. नरांनी स्त्रीला रक्षणीय मानली,

दुबळी मानली, स्वत:ला तिचा रक्षक मानले. हळूहळू याच परंपरेचे संस्कार नर-मादीवर झाले. तेव्हापासून नर रक्षक व मादी रक्षणीय झाली. या मादीच्या रक्षणासाठी गुहा तयार झाली. झोपडी बांधली गेली. या मादीची पिल्लं आपली ताकद वाढवतील, असा नरांचा विचार असावा. मादीच्या मनात तिच्या पिलांबद्दल वात्सल्य निर्माण झालं. ती हळूहळू मार्दव असलेली झाली. मादीला पिल्लू होण्यात आपलाही वाटा आहे, हे नरांच्या बराच काळ लक्षातच आलं नाही. पण आपली शिकार करण्याची ताकद लक्षात घेऊन, नर धाकधपटशा दाखवून, नारीकडून हवं ते हवं तेव्हा मिळवू लागला असावा.

नर व मादीचे हे असे स्वभावविशेष निश्चित होत गेले. शेकडो-हजारो वर्षांच्या प्रवासात त्यातल्या छटाही स्पष्ट होत गेल्या. नर आक्रमक झाला. मादी (शक्यतो) मुकाटपणे सहन करणारी झाली. त्यामुळे बलात्कार झाला म्हणजे, स्त्रीचेच काही चुकले असेल. तिने भडक कपडे, उथळ शृंगार करून पुरुषाला आकर्षित केलं असेल. म्हणूनच त्याने चेकाळून तिच्यावर बलात्कार केला असेल. त्याच्या बिचाऱ्याकडून बलात्कार झाला असेल तर परिस्थितीच तशी होती. तो तरी दुसरं काय करणार? बिच्चारा! हाच बिचारा नरपशू महिना दोन महिन्यांच्या मुलीवरही बलात्कार करतो. यात त्या मुलीने किंवा वृद्धेने

केव्हा, किती व कोणता मेकअप केला होता? स्त्री दिसायला सुंदर असो की कुरुप, तिने साजशृंगार केलेला असो की नसो, तिची अगतिकता हेच पुरुषाचे भांडवल ठरते. सामान्यत: पुरुष आक्रमकच असतो. पुरुष संस्कारांनीच सभ्य होऊ शकतो, स्वत:वर नियंत्रण ठेवू शकतो. हातोडा-छिन्नीचे घाव बसले तर, दगडातून मूर्ती तयार होते. नाहीतर तो दगडच. चालताना ठेच लागताच पाय रक्तबंबाळ होतो, कारण तो दगड. खूप संस्कार केले, वरचेवर संस्कार केले तर नरातून जबाबदार व समंजस पुरुष निपजणार, नाही तर नाही. स्त्री आक्रमक नसते. तशी परिस्थिती तिला झुकते माप देणारी असेल (अशी वेळ फारच क्वचित येते) तरच आक्रमक होते. स्त्रीने बलात्कार केला अशी तक्रार किती पुरुष करतात? पुरुषाने स्त्रीवर बलात्कार केल्याच्या तक्रारी तर लाखोंनी असतील. स्त्रिया दिसायला कशाही असोत. त्यांची जात कोणतीही असो (भारतात सवर्णांनी अस्पृश्य स्त्रियांवर बलात्कार केल्याची उदाहरणं आहेत.) धर्म कोणताही असो, स्त्री रजस्वला असो वां तिची तब्येत बरी नसो, ती स्त्री आहे ना, पुरुषांना ती बलात्कार करायला चालते.

पाळीच्या काळात, पीरिएड चालू असताना स्त्री स्वत:ला कमकुवत मानते. खरं तर पाळी येणं हे स्त्रीच्या, पुनरुत्पादन शक्तीचे प्रतिक आहे. स्त्री सृजनाची स्रोत आहे. त्यातच तिचे अलौकिकत्व आहे. आपल्या

हाडामांसा-रक्तातून नऊ महिने उदरात वाढवलेलं बाळ, ही सर्जक स्त्री जगाला देते, ही तिची किती मोठी ताकद आहे. पण ही निसर्गाने दिलेली शक्ती अगदी सहज प्राप्त होते, त्यामुळे त्या शक्तीचं महात्म्य पुरुषाला राहिलं नाही. प्रत्यक्ष स्त्रियांनाही राहिलं नाही.

वात्सल्यामुळे स्त्रीची आई होते, एक जबाबदार व्यक्ती होते. हे वात्सल्य, प्रेम, आपुलकी, समजूतदारपणा यामुळे स्त्री स्वतःच्या व इतरांच्या दुःखाने द्रवते. तिच्यातली माणुसकी तिला स्वस्थ राहू देत नाही. मनाचा हा कोमलपणा म्हणजे जगाच्या लेखी दुबळेपणा असतो. स्त्रीच्या कोमल हृदयाची पर्वा सर्वसामान्यपणे इतरांना नसते. पुरुषांना तर नसतेच नसते. साहजिकच स्त्रियांना मानसिक आधाराची गरज भासते. खरं तर पुरुषांनासुद्धा मानसिक आधाराची तितकीच गरज असते. शेतात काही पिकलं नाही किंवा पिकलं तशी रास्त किंमत मिळाली नाही तर पुरुष शेतकरी आत्महत्या करतो. इतरांचं काय होईल हा विचार त्याला आत्महत्येपासून परावृत्त करत नाही. शेतकरी स्त्री मात्र खंबीर असते. नवरा गेला तरी संसाराचा गाडा ओढायला ताठ मानेने पुढे येते. कोणतीही आपत्ती कुटुंबावर येवो, पुरुष गर्भगळित होतो. स्त्री मात्र खंबीरपणे काळाला तोंड देते. पण स्त्री तिचे गुण विसरली आहे की काय अशी शंका येते. ती पुरुषामध्ये आधार शोधते आणि नेमका याच गोष्टीचा पुरुष

गैरफायदा घेतो. आधार मागायला आलेली स्त्री आपल्यावर भाळली आहे, असा समज पुरुष करून घेतो. अनेकदा पुरुष आपल्यापाशी व्यक्त होणारी स्त्री आपल्या प्रेमात पडली आहे, असा गैरसमज करून घेतो. कोणत्याही निमित्ताने आपल्याकडे आलेली स्त्री हे आपलं भक्ष्य आहे असा पुरुषांचा समज होतो. व त्यामुळे ते बलात्कार करू धजावतात.

***

गरीब, एकाकी, विधवा, परित्यक्ता, लग्न न केलेली किंवा लग्न होऊ न शकलेली स्त्री पुरुषाला गरजू वाटते. परिस्थितीने गांजलेल्या तर कित्येकजणी असतात. सामान्यत: गरीबीमुळे वैतागलेल्या बऱ्याचजणी असतात. त्यांचा साहजिकच लवकर तोल जातो, त्यामुळे भांडणे होतात. घरातले बेजबाबदार पुरुष व त्यांचं वर्तन हे तर भांडणांना कारणीभूत झालेलं असतेच. कर्तव्य म्हणून घरासाठी खूप काही करणाऱ्या स्त्रिया या भांडणांना वैतागतात. त्यांना आपल्या मनाची घुसमट कोणाजवळ तरी व्यक्त करावीशी वाटते. मुली शिकू लागल्या, नोकरी करू लागल्या की तिथे पुरुष सहकारी भेटतात, त्यांच्याजवळ मनमोकळे करावेसे वाटले तर त्यात काही गुन्हा नाही. पण त्या बाईची गरज वेगळी असल्याचे लक्षात न घेता ती आपल्या प्रेमात पडलीय असाच समज केला जातो. 'लिव इन' मध्ये राहणारी बरीचशी जोडपी अशीच असतात. पुरुषांनाही मन मोकळं

करावंस वाटतंच पण ते मनातून लवकर मुक्त होतात व शरीरात अडकतात. प्रेम म्हणजे शारीरिक आकर्षण नव्हे, तसंच प्रेम म्हणजे मनातलं सारं ओकून टाकण्याची जागा नव्हे.

स्त्री व पुरुष या दोघांच्या शरीराची रचना वेगवेगळी आहे. आपण जितका जास्तीत जास्त निसर्गाचा विचार करू, तसतसं निसर्गाबद्दल खूप आश्चर्य वाटू लागतं. जगाचा हा पसारा पेलत, सृष्टीचे रहाटगाडगे अखंड चालू राहावं अशीच योजना निसर्गाने आखलीय. निसर्गाकडे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आहे. मानवाला जी बुध्दिमत्ता निसर्गाने बहाल केलीय, जो मेंदू दिलाय, त्यामुळे सर्व प्रश्न सोडवण्याची ताकद मानवाला लाभली आहे. पण नेमकं काय काय निसर्गाने मानवाला बहाल केलंय, तेच अजून स्पष्टपणे कळलं नसल्यामुळे, मानवापुढे अनेकानेक कोडीच उभी ठाकलेली आहेत. हळूहळू माणूस प्रगती करेल तशी ती कोडी सुटतील.

निसर्गाने पुरुष निर्माण केला व स्त्रीही निर्माण केली. त्यांना बुद्धी, मन, भावना इ. गोष्टी निसर्गाने बहाल केल्या. पण तरी शिकवल्याशिवाय माणसाला फारसं काही येत नाही. जेवण करताना हात तोंडापाशी न्यायचा कसा किंवा चमचा तोंडात रिकामा कसा करायचा हेही येत नाही, तेही शिकवायला लागतं. उपजत काही शक्ती व प्रेरणा माणसाला मिळाल्या हे खरं पण त्यांचा उपयोग कसा करायचा व त्यासाठी माणसाला

मिळालेल्या इंद्रियांचा कसा उपयोग करायचा हेही शिकवावं लागतं.

स्त्री व पुरुष यांच्या शरीररचनेत, विशेषत: जननेंद्रियात फरक आहे. तो काय आहे? हे सहजपणे समजून घेता येतं, नाही असं नाही. लहान बाळ शरीराच्या गुप्त अंगांना स्पर्श करतं, त्याला त्यावेळी काही वाटत नाही. पण जवळपासची मोठी माणसं पटकन् त्याला चापटी मारतात. बाळांना चड्डी घालायला, झबलं घालायला शिकवतात. त्यामुळे त्या बाळांना नागडं राहू नये, काही इंद्रिये कोणालाही दिसू नये म्हणून, काळजी घ्यायला शिकवलं जातं. का? माहित नाही? पण हे गुप्त काहीतरी आहे, ते कोणाला दिसू नये, ते झाकायचाच सतत प्रयत्न करायचा हे मुलांना कळू लागतं. जे झाकायला हवं, त्यात झाकण्यासारखं काय आहे? ते मात्र कळलं नाही. त्यातून एक प्रकारचा चोरटेपणा येतो. तुम्ही जे जेवढं झाकाल, तेवढं ते जाणून घ्यायची इच्छा बळावत जाते. त्यातूनच पुढे अनर्थ होतात. जननेंद्रियांना गुप्तांग म्हटलं जातं, इथेही भाषेतसुद्धा गुप्तपणा आला, जे गुप्त ते जाणून घ्यायची इच्छा प्रबळ होते. या सर्व अनैसर्गिक गोष्टींपासून मुक्त राहून नैसर्गिक काय आहे, ते समजून घेण्याचं शिक्षण कुठे मिळेल?

जपानी भाषेत मुलांसाठी लिहिलेली अतिशय सुंदर कादंबरी आहे. कुरोयानागी यांनी लिहिलेल्या या कादंबरीचं नाव आहे. ‘तोत्तोचान’,

त्यात एक प्रसंग आलाय, शिक्षक मुलामुलींना पोहायला शिकवायला घेऊन जातात. नदीवर भिजू नयेत म्हणून सर्व कपडे काढायला सांगितलं जातं. सर्व मुलमुली क्रमाक्रमाने पोहायला शिकतात. त्यातून मुलं काय शिकली की, मुलीचं व मुलाचं लिंग वेगवेगळं असतं. त्याचा उपयोग काय? शिक्षकांनी समजावून सांगितलं. साहजिकच मुलगा मुलगी यांच्यात गुप्त काही राहिलं नाही. लहान वयात त्याचा जो उपयोग कळायचा तो कळला. उगीचच चोरून पाहणं नाही, चेष्टा मस्करी नाही, नावं ठेवणं नाही. जिज्ञासा गेली. भिन्न लिंगीयांमध्ये मोकळेपणा आला. मोकळेपणा आला की वर्तन सुधारते. सामान्यतः सगळीकडे सगळ्या समाजात मुलामुलींमध्ये हा मोकळेपणा शिकवला जात नाही आणि मनुष्य प्राण्याला शिकवल्यावाचून काही येत नाही.

***

मोकळेपणाच्या बाबतीत आदिवासी समाज खूप पुढारलेला आहे. त्यांच्यात सर्व कार्यक्रमात नृत्याला स्थान असतेच. नृत्यात स्त्री-पुरुष एकत्रच असतात. एकमेकांच्या हातात हात घालून प्रसन्नपणे नाच करतात. गोंड जमातीतल्या बायका अगदी आत्ताआत्तापर्यंत उघड्याच वावरायच्या (अंगावर पोलकं नाही, एक धडपा कापडाचा कमरेला गुंडाळलेला, हाच पोषाख) वयात आलेल्या तरुणतरुणींसाठी एकत्र

नाच-गाणं-खेळ, यासाठी 'घोटुल' असायचं. यातून मुलंमुली आपापला जोडीदार निवडायची, लग्नही लावलंच पाहिजे असं नाही. आवडलेल्या जोडीदाराबरोबर संसार सुरू व्हायचा, एकमेकांची निवड करायला घोटुल उपयोगी पडे. (घोटुल म्हणजे आदिवासींचं संस्कारकेंद्र. पण अलीकडे त्याचाही फारसा उपयोग केला जात नाही.)

परिस्थिती गरिबीची. खायला, प्यायला फारसं नाही. पण संसाराची इच्छा बलवत्तर. जात पंचायतीला सांगून एकत्र रहायला जोडपी तयार. लग्न लागलं तर देज (दहेज, हुंडा) मुलाच्या बापाने मुलीच्या बापाला द्यायचा. पुढेही काही कारणाने नवरा-बायकोचं नाही पटलं तर देजची परतफेड करायची की, मुलगी दुसऱ्याबरोबर रहायला मोकळी. काही काही वेळेला तर पुरेसे पैसे जमत नाहीत म्हणून लग्नविधी लांबणीवर पडतात. लग्नविधीत अनेकदा त्या जोडप्याची मुलंही हजर असायची. दिलेला शब्द पाळायचा, प्रामाणिकपणे राहायचं, मुलांची आबाळ होऊ द्यायची नाही, कष्टाला कमी पडायचं नाही, फसवाफसवी नाही. असे अनेक गुण आदिवासी समाजाच्या स्त्रीपुरुषांमध्ये आहेत. त्यामुळे या समाजात बलात्कार होत नाहीत. जातीबाहेरचे कोणी येऊन फसवणूक करत असेल, जबरदस्ती करेल तर तो वेगळा प्रकार. मग बलात्कार संभवतो पण आदिवासींमध्ये नाही. अशाच प्रकारच्या अनेक प्रथा परंपरा

मी भटक्या जमातीत पाहिल्या आहेत.

बलात्कारात संभोग येतो. बाकी स्पर्श करणे, चुंबन घेणे, गोंजारणे वगैरे गोष्टी छेडछाडीत जमा होतात. त्याला बलात्कार म्हणता येणार नाही. स्त्रीच्या इच्छेविरुद्ध संभोग केला जातो तो बलात्कार, लग्नाने एकत्र येणाऱ्या जोडीदाराने जरी इच्छेविरुद्ध संभोग केला तर तो बलात्कारच आहे. मुळात कायदा-प्रथा-परंपरात स्त्रीचा रास्त सन्मान बऱ्याच ठिकाणी करण्यात आला आहे. पण एकूण समाजात स्त्रीच्या सन्मानाचेच खच्चीकरण केले जात असल्याने, स्त्रीला बलात्काराला सामोरे जावे लागते.

एकदा स्त्रीला दुय्यम ठरवली की समाज एकतर्फीच वागू लागतो. वास्तविक निसर्गाने स्त्री-पुरुषांना समान दर्जा दिलाय. पण स्वार्थी पुरुष समाजाने स्त्रीची पार अवहेलना करून टाकली. आपत्ती आली. निराशा भेडसावू लागली, परिस्थितीचा रेटा अंगाशी आला की, पुरुष स्त्री-सहवासाची अपेक्षा मनी धरतो. अनेक पुरुष स्वत:चं मन शांत करण्यासाठी विडी वा सिगारेट ओढतात, दारू पितात, अफू, गांजा, चरस सेवन करतात. तरी त्यांच्या मनाची तलफ भागत नाही. मग बाई सहज मिळाली तर ठीक, नाहीतर पुरुष ते धाकाने, पैशाने, बळजबरी करून मिळवतो. अत्याचार करतो. अखेर बलात्कार करतो आणि मग शिथील

पडून बाजूला जातो. इथे एकतर स्त्री फसवली जाते किंवा ती अगतिक होते. बलात्काराने पुरुष जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असला तरी, त्यातून स्त्रीला कसलीही समाधानाची भावना येत नाही.

काही काही ठिकाणी स्त्रियांना असं शिकवलं जातं की, बलात्कारांची वेळ आलीच तर विरोध करू नका, शांत पडून जे होईल ते सोसा, म्हणजे जखमा तरी होणार नाहीत आणि खुनाची पाळी येणार नाही. हा उपदेश देताना मी स्वत: काहींना पाहिलंय, त्यांना हे कळत नाही की, स्त्री–पुरुष संबंधामध्ये फक्त दोन भिन्न लिंग शरीरांचा संबंध नसतो, तर मनांचाही संबंध येतो. पुरुष सुख ओरबाडून घेतो, त्यामुळे त्यास समाधान मिळत नसावे आणि स्त्रीवर बळजबरी झाल्यामुळे तिच्या वाट्याला फक्त ताण येत असावा. बलात्कार झालेल्या स्त्रीच्या वाट्याला अपरिमित, अबोल दु:ख फक्त येते.

संभोगात खरं तर अलौकिक आनंद असतो. काही क्षणांचाच तो आनंद असतो, पण त्याचा परिणाम बराच काळ टिकतो. त्यात फक्त दोन भिन्न लिंगी शरीरांचा संबंध नसतो. तर मनाचाही संबंध असतो. विवाहित स्त्रीपुरुषांमध्ये पुरुष सुख ओरबाडून घेतो. त्यावेळी जर बळजबरी होत असेल तर त्यात आनंद नसतो. त्यामुळे त्याला समाधान मिळत नाही. स्त्रीपुरुषांनी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांच्या कलाने घेणे, शरीर व

मन एकत्र आले तरच संभोगात आनंद मिळतो. पण या आनंदासाठी स्त्रीपुरुषांचं एकमेकांवर उत्कट प्रेम असावं लागतं. माणसाचा रंग, नाक, डोळे एकूण बाह्य व्यक्तिमत्त्व जसं आहे, त्याचा इथे काही संबंध नाही. बऱ्याचदा तरुणतरुणी एकमेकांना शपथेवर सांगत असतात की, माझं तुझ्यावर प्रचंड प्रेम आहे. म्हणजे काय? रंग, नाक, डोळे, उंची वगैरे बाह्य गोष्टींचे ते आकर्षण असते. अंगावर माशी बसावी आणि दुसऱ्या क्षणी ती उडून जावी, इतकं प्रेम उथळ नसतं, नसावं. लोक जे प्रेम-प्रेम म्हणतात, ते असतं आकर्षण, क्षणकाळ टिकणारं-लस्ट! बाकी काही नाही. खऱ्या प्रेमात दोन माणसं एकमेकांना समजून घेतात, एकमेकांचे गुणदोष समजून घेतात. दुसऱ्याला त्याच्या दोषांसह स्वीकारलं जातं तिथे प्रेम असतं. शरीर व मन दोन्ही जिथे एकत्र येतात, तिथं प्रेम निर्माण होतं, मुरतं. साधा हाताचा स्पर्शसुद्धा आपुलकीचा झरा खुला करून देतं.

बलात्कारात प्रेमाचा संबंध नसतो. एकतर्फी प्रेमाचाही नसतो. एखादी स्त्री एखाद्या पुरुषाला आवडते. तो तिच्यावर म्हणे प्रेम करतो, तो तिला वश करू पाहतो. ती प्रतिसाद देत नाही, तो चिडतो, तिच्या अंगावर एखादं रसायन फेकून तिचा चेहराच भाजून टाकतो, हे प्रेम नाही. हा त्या नकार पचवता न येणाऱ्या पुरुषाच्या अहंकाराचा उद्रेक असतो. लहान मुलाला हवी असलेली वस्तू मिळाली नाही, तर तो ती हिसकावून

घेतो आणि जमिनीवर आपटून आपटून त्या वस्तूचा पार चेंदामेंदा करून टाकतो. तसं ती मुलगी मला मिळत नाही, मग ती दुसऱ्या कोणालाही मिळता कामा नये. म्हणून तिला विद्रूप करण्याचा, भाजून काढण्याचा खटाटोप केला जातो. हे प्रेम नव्हे, ही हिंसा आहे. अहंकार दुखावला म्हणून केलेली हिंसा आहे. लैंगिकतेचे जाणकार मारणे, चावणे, वगैरेला प्रेमाचाच प्रकार मानतात. तसं प्रेम व्यक्त करणारे काही स्त्रीपुरुष असतीलही, पण याचाही अतिरेक होतो, स्त्रीला दंश केला जातो, तेव्हा ती हिंसाच असते. समजून घेताना या हिंसेकडे स्त्रीने काणाडोळा करू नये, ती हिंसाच आहे, ती विकृतच आहे.

काही वेळेस पुरुष करत असलेला संभोग ही स्त्रीसाठी केवळ एक यांत्रिक क्रिया असते. विवाह झालेल्या जोडप्यातसुद्धा स्त्रीला हा अनुभव बऱ्याचदा येतो. या यांत्रिकतेतून तिला दिवस रहात असतीलही, पण तिला त्यात काहीही आनंद मिळालेला नसतो, ती कोरडीठाक राहते, असं का होतं? प्रेमाचा अभाव हेच कारण असतं ना? पुरुषही बेभान झाल्याची नाटकं करतो, पण त्यात प्रेमातला हळुवारपणाही नसतो, प्राजक्ताची कोमलताही नसते. अन् वादळाचा प्रपातही नसतो. एक दमवणारी शारीरिक क्रिया आटोपते, त्यात प्रेम नसते, उथळपणाच जास्त असतो. मग या शरीरसंबंधाला संभोगाला काय म्हणायचं? प्रेमशून्य

शरीरक्रिया...बलात्कार, बलात्कारच तो.

***

माणसाला प्रेम कसं करावं हेही बहुधा शिकवावं लागतं, पुरुषाला व स्त्रीलाही खराखुरा संभोग म्हणजे काय ते शिकवावं लागतं. प्रेम व्यक्त करणं हे नैसर्गिक असेल, पण शरीराच्या माध्यमातून, ते कसं व्यक्त करायचं हे शिकवावं लागतं. त्यासाठी शरीर, त्याचे अवयव, त्यांचे कार्य, मन, मनाच्या निरनिराळ्या अवस्था, त्याचा शरीरावर होणारा परिणाम, शरीर–मनाचा संबंध हे सारं शिकवावं लागतं. हे सर्व शिकवणं म्हणजे 'सेक्स एज्युकेशन' होय. आम्हा भारतीयांना तर अजूनही, या दोन शब्दांची ॲलर्जी आहे. त्यामुळे हाती पडणाऱ्या पिवळ्या पुस्तकांचा प्रभाव पडतो आणि कधी एकदा मी युद्ध सुरू करतो ही भावना पुरुषाच्या मनात निर्माण होते. तर ऐकीव गोष्टींनी घाबरून गेलेली स्त्री संभोग होण्यापूर्वीच शरणागती पत्करते. काही स्त्रिया याला अपवाद असतील, काही पुरुषही अपवाद असतील, पण हे सारे अपवादच, हे विसरून चालणार नाही.

असंख्य पुरुषांना प्रेमाची भाषा समजून घेण्याची गरजही वाटत नाही. आपुलकी, प्रेम वगैरे गोष्टींसाठी त्यांच्याजवळ वेळ नसतो. भावना आणि वासना यात फरक आहे, दोन्हीही नैसर्गिकच, पण वासना

माणसाला विकृतीकडे नेते तर भावना माणूसपणाकडे नेते. बलात्कार करणाऱ्यांच्या लेखी भावनांची किंमत शून्य असते तर वासना मिरवण्यात त्यांना भूषण वाटतं.

एकदा अबोध वयाच्या मुलांनी एकत्र येऊन एका मुलीवर बलात्कार केला. त्यातली दोन मुले १५ वर्षांची, बाकी एकेक चौदा, पंधरा व सोळा वर्षे वयाची होती, ती सगळी पकडली गेली. कोर्टाने त्यांना शिक्षा सुनावली. त्या मुलांची जेव्हा भेट झाली तेव्हा मी विचारलं, का रे केलंत असं? त्या मुलीला काय वाटलं असेल? तेव्हा त्या मुलांनी उत्तर दिले, तिला काय वाटणार? गरीब होती, आम्ही प्रत्येकी दहा दहा रुपये दिले तिला, त्यामुळे तिला आनंदच झाला असेल. त्या मुलांच्या उत्तरात मग्रूरपणा होता. तिला उपकृत केल्याची भावना होती. आपलं काहीच चुकलं नाही याचा गर्व होता. अरे पण तुम्हाला लग्न होईपर्यंत थांबता येत नव्हतं का? (लग्न हा वासना शमवण्याचा मार्ग आहे असाच साऱ्या समाजाचा ग्रह आहे.) पूर्वीच्या काळी निमंत्रण पत्रिकेतच उल्लेख असे की, 'अमक्या अमक्यांचा शरीरसंबंधासाठी विवाह होणार आहे' वगैरे- तेव्हा शरीरसंबंधासाठी विवाह, हा विचार समाजमान्य होता. म्हणून मी त्याचा उच्चार केला. तेव्हा त्या मुलांनी सांगितलं, 'लई टेंशन आलं होतं, चैन पडेना. शेवटी गेलो पोरीकडे. एकट्याची हिंमत होईना म्हणून

सर्वांना बरोबर घेतलं. घरी ती एकटीच होती, तिची आई कामाला गेली होती.' म्हणजे तिच्या आईच्या कामाला जायच्या वेळा तुम्ही नीट लक्षात ठेवल्या होत्या तर. लई टेंशन आलं नसतं तरी गेला असताताच. मी म्हणालो. मुलं गप्पच बसली, त्यातला एकजण म्हणाला, 'नाही साहेब. ही पयलीच येळ होती. आता आम्ही काळजी घेऊ म्हणजे. म्हणजे आता कोणी तरी दुसरं गिऱ्हाईक पकडू,' त्या पोरांशी जास्त बोलवेना.

एकदा कॉलेजचा एक तरुण म्हणाला, काय माल आहे इथे? मी दुसऱ्याच कॉलेजचा. पण इथे येतो पोरी फिरवायला? पोरी काय रस्त्यावर पडल्यात का रे? एखादी मुलगी आवडली तर तिला पकडायचं आणि गाडीवर बसते का बघायचं. पण तिने जर या मुलाला नापसंत केलं, तर मग तिला घराबाहेर पडायची लाज वाटेल असं काहीतरी ही मुलं करतात. सगळ्या मुली त्यांच्यासाठी उपलब्ध आहेत, असं त्यांना वाटत असतं. तिने इतर कोणाला होकार देऊ नये अशी त्यांची इच्छा असते. एखादी मुलगी चांगली वाटली, तर तू छान दिसतेस' असं म्हणून अभिनंदन करावं, पुढे जावं. प्रत्येक आवडलेली गोष्ट आपल्यालाच मिळाली पाहिजे हा आग्रह का? असं विचारलं तर म्हणतात, लै श्यानपन नका शिकवू. तुम्ही बसा देवळात भस्म फासून...!

अशीच एक केस होती. अगदी तरुण तिशीतला मुलगा होता. त्याने

एका १६-१७ वर्षाच्या मुलीवर बलात्कार केला, पकडला गेला. समुपदेशनासाठी मला बोलावण्यात आलं होतं.

का रे तू असं केलंस? तर तो म्हणाला, पाईप भरैला था। खाली करनेका था।

पण त्या मुलीला तू लग्नाचं वचन दिलं होतंस, हया पोरी बावळट असतात. लग्नाचं वचन दिलं की त्या काही करायला तयार होतात.

म्हणजे तू फसवलंस तिला?

ती का फसली? ती काय कुकुळं बाळ आहे का? मी असा बरा लग्नाला तयार व्हईन. मी लग्नाला उभा राहिलो की बाप दोन लाखाचा हुंडा घेतल्यावाचून पोरीच्या बापाला सोडणारच नाही. आमची जात काय आलतुक फालतुक आहे का? आमच्या समाजात आमचा लई मान आहे. असे मुलगा म्हणाला. यावर मी विचारलं, म्हणजे तू हा सौदा करणार, बापाच्या नावावर? जातीच्या नावावर?

पोरी बघून घ्यायच्या, लग्न होईपर्यंत, प्रॅक्टिस नको?

आता कोर्ट तुला असं सोडणार नाही मी म्हणालो.

हॅट, आपल्या बापाची वट आहे. त्याच्या इज्जतचा मामला आहे. तो वाटेल तेवढा पैसा खर्च करील. खास वकील उभा करील आणि मला सोडवीलच.

तसं नाही झालं तर?

शिक्षा होईल, सात वर्षाची, नाय तर दहा वर्षाची. बाकी आयुष्य तर आपल्याच हाती आहे ना! बापाची जाम इस्टेट आहे.

ही केस फार तयारीची होती. मी काय समुपदेशन करणार? अर्धमेला होईपर्यंत फोडून काढला पाहिजे, पण हे आमच्या अहिंसक पद्धतीत बसत नाही. तो सुधारण्याचा वाट पहायची, प्रयत्न सोडायचे नाहीत.

***

बलात्काराची ही समस्या सोडवायची कशी? स्त्री व पुरुष दोघांनाही निसर्गानेच निर्माण केलं. दोघेही समान आहेत. तुल्यबळ आहेत. तरी पुरुष बाईवर बलप्रयोग का करतो? तिची अगतिकता पाहून तिला का फसवतो? फसवणाऱ्याला लाज लज्जा, भीती काही नसते. तो त्याचा स्वार्थ साधत जातो. स्त्रीला समाजाने असं शिकवलं की, ती दुय्यम आहे. तिला काही महत्त्वच नाही, महत्त्व आहे ते सर्व पुरुषवर्गाला. हे चुकीचं आहे, स्वार्थीपणाचं आहे. स्त्री निर्मिती करते, पुरुष नाही करत. स्त्री ही सामर्थ्यवान आहे, सनातन काळापासूनच्या या सामर्थ्याने खरं तर स्त्रीला बलवान करायला हवं होतं. पण असं होत नाही.

जगातल्या सर्व देशात, सर्व धर्मात, सर्व जातीत, स्त्रीला दुय्यम

ठरवण्यात आलेलं आहे. सर्वचजण हे सांगतात, मग ते खोटं कसं असेल असा विचार अनेकजण करतात. या जगात सर्व प्राणी मर्त्य आहेत. जो जन्माला आला तो केव्हाना केव्हा मरणारच हे सत्य आहे. मग त्याला आव्हान देत माणूस आचरटपणाचे प्रयोग का नाही करत? माणूस मर्त्य आहे हे सर्वांना मान्य आहे, त्यामुळेच कोणतीही जात, वर्ग, वर्ण अमर असल्याचा दावा करत नाहीत. कारण त्याचा काही उपयोग होणार नाही हे त्यांना माहित आहे. मृत्यू या नैसर्गिक गोष्टीवर माणसाच्या आढयतेचा परिणाम होत नाही.

पुरुष जेव्हा स्त्रीला दुय्यम नागरिक समजतो तेव्हा ती दुःखी होते, मान खाली घालून अश्रू ढाळत बसते. यापेक्षा भेदाभेद करणाऱ्यांना स्त्रियांनी, प्रश्न केला व हे चूक आहे असं म्हणून ठाम विरोध केला तर! स्त्रिया संघटित झाल्या, जागृत झाल्या, स्वकर्तृत्वाची जाणीव त्यांना झाली, तर पुरुष स्त्रियांना टाचेखाली दाबून ठेवू शकणार नाहीत. मग पुन्हा दुसरा प्रश्न निर्माण होतो, आपल्या भारतीय संस्कृतीत रामायण व महाभारत हे दोन महान ग्रंथ निर्माण झाले. त्यातले राम आणि कृष्ण यांना युगपुरुष मानलं गेलं. तरी रामाने सीतेला एका मुर्दाड पुरुषाच्या टीकेला महत्त्व देत पुन्हा वनात का नेऊन सोडली? मर्यादा पुरुषोत्तम रामाने तिच्यावर अन्याय केल्यावरसुद्धा सीतेने पातिव्रत्य का मिरवलं? रामाला

त्या सक्षम भूमिकन्येनं जाब का विचारू नये? पाच पांडवाची एक पत्नी द्रौपदी ती पाच पाच नवऱ्यांशी विवाह कसा काय करू शकली? तिच्यासारख्या अग्निशिखेला पांडवांनी तिच्या पतींनी, तिला जुगारात पणाला कसे लावले? तिची वस्त्रे ज्यावेळी दुःशासन फेडत होता तेव्हा सारे पांडव माना खाली घालून गप्प कसे बसले? प्रत्येक संस्कृतीत असे काही अनुत्तरित प्रश्न राहून गेले आहेत. कोणी ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्नही केला नाही. मग हे दुय्यमत्वाचं दुःख भोगणाऱ्या गुलाम स्त्रिया यावर काय प्रश्न करणार? जगातल्या सर्व महान संस्कृतींचा इतिहास ७ ते १० हजार वर्षांचा आहे. एवढी वर्ष गेल्यानंतरसुद्धा अमेरिकेसारख्या प्रगत देशात, काळ्या वर्णाच्या नागरिकावर पोलिस अत्याचार कसा करू धजतो? भारतासारख्या समानतेचं मूल्य मानणाऱ्या देशात, बलात्काराच्या वणव्यात हजारो स्त्रिया का होरपळत आहेत? युरोपातही गरीब वर्गावर जुलूम का होत आहेत?

संत तुलसीदासांनी ‘नारी, गर्दभ, ढोल, सब ताडन के अधिकारी’ असं म्हटलं आहे. आता हे बास झालं. कोणत्याही धर्मातल्या संतांनी किंवा साधुपुरुषांनी कितीही विषमतेचे गोडवे गावोत किंवा कोणीही जात, वर्ण, धर्म, पंथ, स्त्री-पुरुष, गरीब, श्रीमंत, अशी विषमता संस्कृतीत रुजवण्याचा प्रयत्न करो, आपण ती संपवली पाहिजे. समानतेचा,समतेचा

आग्रह धरला पाहिजे. काळ बदलला, इतिहासात गोष्टी घडून गेल्या, आता त्यातलं जे त्याज्य आहे ते टाकून द्यायला आपण तयार असलं पाहिजे. चुकीच्या मूल्यांना, थडग्यांना हार घालणं बंद करायला पाहिजे.

***

स्त्री व पुरुष हे समान आहेत. दोघांमध्ये काही गुण आहेत. दोघांच्याही काही मर्यादा आहेत. पुरुषामध्ये स्त्री उपभोगाबद्दलची भावना निसर्गतःच जास्त आहे. म्हणून नर आक्रमक होतो, हे खरे आहे का? याचे संशोधन करा. पुरुषात वासना जास्त प्रमाणात आढळली, तर त्याच्यावर असे संस्कार करा की, तो स्त्रीवर मालकी हक्क गाजवणार नाही.

लहानपणापासून समानतेचे संस्कार जाणीवपूर्वक करावे लागतील. त्यातही स्त्रियांना अधिक सक्षम व्हायला शिकवलं पाहिजे. यासाठी शस्त्रांचे शिक्षण देण्याची गरज नाही किंवा ज्युदो-कराटे शिकवण्याची गरज नाही. ताकद शस्त्रात नसते, मनात असते, ते मन बळकट केलं पाहिजे. एखादा पुरुष अंगचटी येतोय, नको तिथे स्पर्श करतोय, प्रेमाची भाषा करतोय, पण त्याचा नेमका अर्थ काय, डोळ्यांची भाषा काय सांगत्येय, हे सर्व लक्षात घेतलं पाहिजे. स्त्रीला अनेक गोष्टी समजत असतात, समजत नसेल त्यांना समजावून सांगितलं पाहिजे. अशावेळेला

त्या पुरुषाकडे न घाबरता थेट तिखट नजरेने पाहिलं किंवा काही कळायच्या आत एक फाडकन् मुस्कटात ठेवून द्यायला हवी. आकस्मिक हल्ला झाला, विरोध झाला तर पुरुष घाबरतो, तो पुन्हा अंगचटी येत नाही. एकापेक्षा अनेक पुरुष बाईच्या अंगावर धावून गेले तर माणसांच्या टोळक्यात असं करण्याची धमक नसते. समूहातील कोणीतरी त्या टोळक्याला जाब विचारला व बाकीच्यांनी त्याला साथ दिली, तर टोळकं हळूच सटकून निघून जातं. बाईला मग घाबरण्याची गरज नाही. शिवाय मोबाईलवरून कुटुंबाला, पोलीसांना कळवलं की, तेवढाच अंगावर धावून येणाऱ्यावर धाक बसतो.

पुरुषोत्तम करंडकासाठीच्या एकांकिका स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला. ज्यांना करंडक मिळाला, त्या गटाने जल्लोष केला. रस्त्याने जाताना त्यातले तरुण रस्त्यातील तरुणींना धक्के मारत होते. सायकलवरून जाणारी एक तरुणी सायकलवरून खाली उतरली, पण प्रतिकार करण्याऐवजी तिला रडूच फुटले. त्याच रस्त्याने मी चाललो होतो. मी तिला म्हणालो, त्याने तुला धक्का मारला ना? राग येतोय ना? पकड त्याला आणि दे दोन लाफा. मी माझं वाहन पुढे दामटलं, त्या तरुणाला पकडलं ती मुलगी धावत आली. आणि तिने दोन लाफा हाणल्या त्याच्या मुस्काटात. तो घाबरून पळाला. आता ती रडू लागली.

का ग? तू का रडतेस? त्याने मला एकटीला गाठून मारलं तर? अशी प्रतिकार करणारी उदाहरणं वाढली पाहिजेत.

स्त्री व पुरुष समान आहेत, मुलगा व मुलगी यात भेद नको हे सारे संस्कार लहानपणापासून केले पाहिजेत. कपाळावर टिकली कशी लावायची, चहा कसा करायचा, चपात्या कशा लाटायच्या, इत्यादी शिक्षण केवळ मुलीला देऊन तिची सर्व जडणघडण लग्नासाठीच करायची ही आत्तापर्यंतची पद्धत. काही अपवाद असतील. पण ते सोडले तर लग्न हा सर्वात मोठा योग मुलीच्या आयुष्यात जुळून येणार, त्या लग्नासाठी व संसारासाठीच मुलीचे सर्व शिक्षण. हे संस्कार थांबवायला हवे. संसार स्त्री व पुरुष दोघांचा असतो, तेव्हा दोघांचीही त्यासाठी तयारी करणे आवश्यक आहे.

एखादा कोणी तरुण आला व माझं तुझ्यावर प्रेम आहे म्हणू लागला, तुम्हीही तुमच्या दृष्टीने मैत्रीचा विचार करून त्याला भेटू लागलात की, एक दिवस अचानक शरीरसुखाची मागणी तो करतो. तुम्ही गडबडता, नकार देता, तो मी लग्न करणार आहे तुझ्याशी असं म्हणून आणाभाका घेतो. मग तुम्हीही शरीरसुख द्यायला (घ्यायला नव्हेच, कारण काय तर हे मुलींना कोणी शिकवलेलंच नसतं.) तयार होतात. हे चूक आहे. शरीर कुठे अदृश्य होतंय का? होऊ दे लग्न. मग बघू असं का

म्हणत नाही? तुम्हालाही त्या सुखाची ओढ असतेच, पण तुम्ही थोडा संयम बाळगला नाही, तर सर्व आयुष्य उद्ध्वस्त व्हायची वेळ येते ना! तो ॲसिड फेकेल, विद्रुप करेल, ही भीती तेव्हा मुलींच्या मनात असते का? असली तर ती भीती त्यांनी मनातून काढून टाकायला हवी. 'आपण बोट पुढे केलं की तो हात धरतो', अशी म्हण आहे. तसं होतंय का, की आपलं खरोखरच प्रेम आहे, प्रेम असेल तर घरच्यांना सांगा, तेव्हाच हिंमत दाखवली तर खूप सारे प्रश्न मिटतील.

स्त्रियाच आम्हाला मोहात पकडतात, प्रेमाचं नाटक करतात, फसवतात, एकावर प्रेम अन् लग्न दुसऱ्याशीच करतात. हा अनेक पुरुषांचा आक्षेप असतो. स्त्रिया अत्याचाराची, बलात्काराची खोटीच तक्रार करण्याची भीती घालतात व फसवतात. हाही पुरुषवर्गाचा एक आक्षेप असतो. क्वचित असं घडत असेल, नाही असं नाही. पण स्त्रियांनी असं करू नये. स्त्रियांच्या बाजूने कायदे करण्यात आले आहेत, त्यांची नीट माहिती घेऊन त्यांचा स्त्रियांच्या रक्षणासाठीच उपयोग होईल, याची काळजी स्त्रियांनी घेतली पाहिजे तसे शिक्षण त्यांना दिलं पाहिजे. स्त्रियांनी स्वत:च्या लग्नाची काळजी करण्यापेक्षा शिक्षण, कौशल्य, व्यवहार याचे शिक्षण घेऊन श्रम करून पैसे कमवले पाहिजेत. त्यासाठी आत्मनिर्भर होण्याकडे लक्ष दिले पाहिजे तेच फार महत्त्वाचं.

सध्या ७ वी, १०वी, १२वी हीच बहुसंख्य स्त्रियांच्या शिक्षणाची मर्यादा आहे. मग लग्न व मूल हाच क्रम आहे. अजूनही वय वर्षे १६-१७ च्या आतच अनेक मुलींची लग्ने होतात व त्यांना लहान वयात मूलबाळही झालेले असते. हे चित्र स्त्रियांनी बदलायला हवं. शिक्षण कितीही चांगले असले तरी आपण बदलायचं नाही, अशी प्रतिज्ञा जर पालक व मुलींनी घेतली असेल तर बदल कसा होणार! सुखी व्हायचंय ना, सुख कशात आहे? केवळ जाहिरातींवर विश्वास ठेवून चालणार नाही, डोळे उघडे ठेवून आजूबाजूला बघण्याची गरज आहे. शिक्षण, कमाईचे कौशल्य, घर उत्तम चालवण्यातले सुख, स्त्रीपुरुष संबंधातील सुख म्हणजे लैंगिक शिक्षण हे सर्व क्रमाक्रमाने मिळवा. म्हणजे आयुष्य चांगले जगता येईल. स्त्री व पुरुष या दोघांनाही शरीरसबंधातून सावरीच्या कापसासारखे सुख मिळाले पाहिजे. सावरीचा कापूस हवेच्या झोताबरोबर उंच उंचच जातो. ते सुख स्त्री पुरुषांना शरीरसंबंधातून मिळते का? ते असेल तर खराखुरा आनंद लाभेल. नाहीतर येईल यांत्रिकता, कृत्रिमता, सुखाचा भास, स्वत:ला फसवणे आणि सुखाच्या शोधात आणखी आणखी घोळ.

एखाद्याने स्त्रीवर बलात्कार केला, तर समाजातील लोक त्याला वेगवेगळ्या शिक्षा देऊ इच्छितात. कोणी म्हणतं फाशी दया, कोणी म्हणतं लिंगच कापून टाका. याला काही अर्थ नाही या अघोरी शिक्षांनी

बलात्काराची इच्छा नष्ट नाही होणार. स्त्री-पुरुष, मुलगे-मुली एकमेकांत मिसळले पाहिजेत. त्यांच्यात मैत्री निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी लहान वयापासून समजेल अशा शब्दात मुलामलींना लैंगिक शिक्षण दिलं पाहिजे. साधारणपणे मुली वयात आल्या की, त्या व मुलगे एकत्र येणार नाहीत याची समाज काळजी घ्यायला लागता. मुलगी वयात केव्हा येते, पूर्वी १४-१५ व्या वर्षी मुली वयात येत असत. काळ बदलला, जीवनशैली बदलली . त्याप्रमाणे वयात येण्याचं वर्षही पुढे मागे व्हायला लागले. हेही निसर्गामुळेच घडते. अलीकडे मुली १०व्या ११व्या वर्षीच वयात येतात. वयात येणं म्हणजे काय?

मुलींची पाळी सुरू झाली की त्या वयात आल्या असं म्हटलं जातं. या वयात मुलींच्या शरीरात बदल होऊ लागतात, तसेच मनातही बदल होऊ लागतात. साधारणपणे मुलगेही १३-१४ व्या वर्षी वयात येऊ लागतात. मुलग्यांचा आवाज थोडा फाटतो. वयात येण्याच्या क्रियेबरोबर स्त्रियांना पुरुषांबद्दल, व पुरुषांना स्त्रियांबद्दल खूप आकर्षण वाटायला सुरुवात होते, हे सर्व नैसर्गिकच असतं. स्त्री-पुरुषांनी एकत्र यावं व त्यातून संतती निर्माण व्हावी आणि सृष्टीचे जीवनचक्र चालू राहावं हा त्यातला उद्देश. मग या अडनिडया वयापासून स्त्री पुरुषांची संतती जन्माला घालायची का? स्त्रीच्या शरीराची वाढ बाळंतपण पेलण्याइतपत

व्यवस्थित झाली पाहिजे व पुरुषाला जबाबदारीचं व कर्तव्याचं भान आलं पाहिजे. आता अश्मयुग नाही, त्यामुळे येतील तशी बालकं जन्माला येऊ देत, वाढतील तशी वाढू देत, असं म्हणून नाही चालणार. निसर्गाने माणसाला मेंदू दिलाय, बुद्धी दिली आहे, मन दिलं आहे, त्यांचा वापर न करताच जगू, असं माणूस म्हणू शकत नाही. निसर्गाने जे दिलं आहे, त्याचा उपयोग माणसाला करावाच लागेल, कारण कृतीची प्रेरणा मेंदूतच असते. कमी जास्त प्रमाणात त्याचा उपयोग करावाच लागेल. निसर्गाने जे दिलंय त्याचा वापर नाही केला तर ती गोष्ट गोठून जाईल, लोखंडाप्रमाणे गंजून जाईल. समजा आपण आपला एक हात वापरलाच नाही, तर तो लाकडाप्रमाणे होईल निर्जीव बनेल. निसर्गाने दोन हात का दिले, एक का नाही दिला किंवा चार का नाही दिले? निसर्गाचा हेतू जाणून घेऊन उत्तर शोधणे हे माणसाचे काम आहे. त्यासाठी निसर्गाने माणसाला बुद्धी दिली आहे. एकपेशीय प्राण्यापासून आत्तापर्यंतच हजारो वर्षात मानवाने बरीच प्रगती केलीय, तिथून आता मागे नाही जाता येणार. एक तर पुढे जा किंवा संपूर्ण विनाश करा. तेही पुन्हा निसर्गावरच अवलंबून आहे.

***

मुलंमुली वयात येण्याच्या काळात त्यांच्यात मनाचा मोकळेपणा असला पाहिजे. एकमेकांचं आकर्षण वाटणारच, पण समजूतदारपणे

वागून मनावर नियंत्रण ठेवता आलं पाहिजे. बेबंद वर्तन माणसाच्या सुखासाठी हानिकारक आहे. सरकारने नागरिकांसाठी काही कायदे केले आहेत. जसं भारतात लग्नाचे वय पुरुषाचे २१ व स्त्रीचे १८ तरी किमान असले पाहिजे असं म्हटलं आहे. स्त्रीपुरुषांना एकमेकांचे उत्कट आकर्षण वाटण्याचे वय १५ ते २५ हे आहे. विवाहाचे वय तर पुरुषांचे २१ असावे असं म्हटलं आहे, मग काय करायचं? सध्या काय केलं जातंय? आमच्याकडे शाळा व महाविद्यालयात एकाच वर्गात मुले-मुली बसतात, पण तरी ते सहशिक्षण नसते. मुलांच्या बाकांची रांग वेगळी, मुलींची वेगळी. हे कसलं सहशिक्षण? मुलांनी मुलींकडे पाहायचं नाही, मुलीनी मुलांकडे पाहायचं नाही. मग चोरटेपणा येतो, मोकळेपणा गायब होतो, का असं होतं हे सांगता येत नाही, असे प्रश्नच विचारायचे नाहीत. कोणी विचारलंच तर नीट उत्तर मिळणार नाही. मग पुस्तकात लपवून अश्लिल साहित्य पाहणं, चोरून चिठ्ठ्या पाठवणं, टिंगली करणं असं सगळं सुरू होतं. या सगळ्यातून फक्त विकृती येते, विकृती दुःख निर्माण करते.

शिक्षणामुळे संस्कार होतात, संस्कारामुळे संस्कृती निर्माण होते. संस्कृती माणसाला सभ्य, संयमी, आस्वादक होण्यास मदत करते, आणि दुसऱ्या व्यक्ती व विचारांचा आदर करायला शिकवते. हे होते तेव्हा

माणूसपणाचे दर्शन घडते. हे न घडल्यास माणसातला पशू दिसतो. संस्कृती, संस्कार यामुळे माणसाला वासनांवर ताबा मिळवता येतो व भावनांचे उदात्तीकरण करता येते. हे असेल तर विरुद्ध लिंगांबद्दल आकर्षण वाटले तरी बलात्कार होणार नाहीत.

घरादारातली माणसे स्त्री पुरुष मैत्री स्वीकारत नाहीत, सतत संशयाने पाहतात. मुलीला दडपण्याचा, झाकून ठेवण्याचा प्रयत्न करतात. जितके झाकावं, तितकं आकर्षण वाढतं. आकर्षण इतकं वाढतं की मनाचा स्फोट व्हावा, त्यातून बलात्कार घडतात.पालकांनी मुलांशी, मुलींशी व दोघांनी एकमेकांशी कसं वागायला हवं हेही शिकवलेलं नसतं. मुलांचं विश्व समजून घेणं आणि पालकत्व शिकून घेऊन पचवणं याची फार गरज आहे. मुलामुलींमध्ये मोकळेपणा असला पाहिजे. मोकळेपणाचा अर्थ बेबंदपणाशी जोडू नये.

***

नराचा नारायण नको पण किमान चांगला माणूस घडवण्याचे शिक्षण, चांगला नागरिक होण्याचा संस्कार हे नकळत्या वयापासून मुलामुलींना देण्याची गरज आहे. ही जबाबदारी मुख्यत: पालक व शिक्षक यांची आहे, त्याचप्रमाणे समाजातील सर्व ज्येष्ठ नागरिकांची व मुख्यत: पुढाऱ्यांची, नेत्यांची आहे. साहित्य, नाटक, सिनेमा, दूरदर्शन व

आधुनिक तंत्रशिक्षणाची साधने यांनी त्याला पूरक भूमिकाच घेतली पाहिजे. वास्तवता दाखवण्याच्या नादात कोणीही विकृतीचे उदात्तीकरण करू नये. मात्र नेते, पुढारी, प्रतिष्ठित माणसे यांनी केवळ भाषणे ठोकू नयेत. स्वत:चे वर्तन तसे ठेवावे. प्रत्यक्ष तसे दिसले की सर्वसामान्यांचा त्यांच्या शिकवणुकीवर विश्वास बसेल व त्याचा खऱ्या अर्थाने मुलामुलींवर परिणाम होईल.

आपल्यासारख्याच माणसाला, दुःखाच्या खाईत लोटून मिळवलेलं सुख, हा अप्पलपोटेपणा आहे. सुख ओरबाडून घेणं हा संकुचितपणा आहे. पुरुषांनी हे लक्षात घेतलं पाहिजे की, प्रत्येक स्त्री ही त्याच्यासारखीच स्वतंत्र माणूस आहे. तिला सुखानं, आनंदानं, आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क आहे. कुठल्याही पुरुषाने स्त्रीची विटंबना केली तर, त्याला त्याचा आत्मसन्मान पायी तुडवण्याची शिक्षा द्यायला हवी. पहिल्यापासून सर्व शिक्षण पुन्हा घ्यायला लावावं. संस्कार देणारे शिक्षण पुन्हा घ्यावं लागेल.

मोकळेपणाचे वातावरण तयार करण्यासाठी स्त्रीपुरुष प्रत्येकाने, मैदानावर किमान एक तास एक तरी खेळ खेळलाच पाहिजे. फालतू गप्पा करत बसण्यापेक्षा, विविध कामांचे कौशल्य व त्यातूनच पैसे कमावण्याचे वळण लावावे लागेल. फुकटचा वेळ वाया घालवणे मोबाईल, स्मार्ट

फोनसह सर्व तंत्राधारित गोष्टीमध्ये अनावश्यक वेळ दवडणे प्रत्येकाने बंद करायला हवे. लहानथोर सर्वांनीच रोज मोकळ्या हवेत श्वास घेतला तर तुम्ही प्रसन्न होता की नाही ? हे बघा. असं जर घडलं तर बलात्कार होणार नाहीत. मुख्य म्हणजे स्त्री ही पुरुषाची बटीक नाही, ती त्याची मैत्रीण, साथीदार, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली सन्माननीय माणूस आहे, सर्जनाची प्रेरक शक्ती आहे, हे मनावर ठसवलं पाहिजे.

***

**वंचित विकास**
४०५/९,नारायण पेठ,
मोदी गणपतीमागे, पुणे - ४११०३०
फोन : +९१ ७९७२०८६७३०,
०२०-२४४८३०५०

**Vanchit Vikas**
405/9, Narayan Peth,Behind
Modi Ganpati Temple, Pune - 411030.
Phone : +91 7972086730,
020-24483050

Whats App : +91 7972086730 E-mail : vanchitvikas85@gmail.com

**Vanchit Vikas Social Media ID's**